आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८.०५वाजता

२६ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यंदाचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान /मुंबईची केया हटकर आणि अमरावतीच्या करिना थापाचा गौरव
- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सुपोषित ग्राम योजनेचा प्रारंभ
- ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रसिद्ध मल्याळी लेखक एम टी वासुदेवन नायर यांच्या पार्थिवावर कोझिकोड इथं अंत्यसंस्कार

**आणि**

- बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात दिवसअखेर ऑस्ट्रेलियाच्या  ६ बाद ३११ धावा

**<><><><><>**

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्लीत समारंभपूर्वक वितरण करण्यात आलं. कला तसंच संस्कृती, साहस, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक सेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा विविध सात श्रेणींमध्ये १७ बालकांना असाधारण कामगिरीबद्दल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात मुंबईची १३ वर्षीय केया हटकर आणि अमरावतीच्या १७ वर्षीय करिना थापा चा समावेश आहे. केया हटकर, डान्सिंग ऑन माय व्हील्स आणि आय एम पॉसिबल या दोन बेस्टसेलर पुस्तकांची लेखिका आहे. तिला कला आणि संस्कृती क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कृत करण्यात आलं. करिना थापाला तिच्या धाडसाबद्दल राष्ट्रीय बाल पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तिनं अतुलनीय प्रसंगावधान दाखवत  आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून तब्बल ३६ जणांचे प्राण

वाचवले होते. या बालकांचे साहस अद्वितीय असून भारतीयांसाठी प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपती याप्रसंगी म्हणाल्या….

शीख धर्मियांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांचे दोन पुत्र, बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या बलिदानाचं स्मरण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

**<><><><><>**

अमरावतीच्या करीना थापाला आज राष्ट्रपतींच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमरावतीमधल्या जय अंबा इमारतीमध्ये सिलेंडरमुळे लागलेल्या आगीतून अनेकांना वाचवणारी करिना त्या दिवशीच्या घटनेबाबत म्हणाली….

तिच्या साहसाबद्दल अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी सांगितलं…

**<><><><><>**

वीर बालदिवस हा देशातल्या नागरिकांसाठी राष्ट्रीय प्रेरणा दिवस असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. देशापुढं इतर काहीही महत्त्वाचं नाही हीच साहेबजाद्यांच्या बलिदानाची शिकवण असल्याचं ते म्हणाले**….**

यावेळी प्रधानमंत्र्यानी सुपोषित ग्राम पंचायत योजनेचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांनी यावेळी केला. पोषण आहाराशी संबंधित सेवा सुविधा सामाजिक

योगदानातून ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध करुन देणं हे या अभियानाचं उद्दिष्ट आहे.

वीर बालपुरस्कार विजेत्या मुलांशी या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. तसंच नंतर झालेल्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवला. आणि मानवंदना स्वीकारली. विविध राज्यांच्या पारंपरिक समृद्धीचं दर्शन घडवणारी वेशभूषा केलेल्या मुलांची पथकं आणि चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते. देशभरातून सुमारे तीन हजाराहून अधिक मुलं या सोहळ्यात सहभागी झाली होती.

**सांगली** शिक्षण संस्थेच्या पथकानं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत लेझीम कलाप्रकाराचं प्रात्याक्षिक सादर केलं. संस्थेतल्या १८ विद्यार्थिनी सह ४ वादक, १ व्यवस्थापक आणि १ संघ प्रमुख अशा २४ जणांच्या संघाने हे प्रात्यक्षिक यशस्वी केलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये पूंछ इथं मंगळवारी झालेल्या एका अपघातात शहीद झालेल्या जवानांना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. या अपघातात शहीद झालेल्या महाराष्ट्रातल्या दोन जवानांच्या कुटुंबांना राज्य सरकारच्या वतीनं १ कोटी रुपये आर्थिक मदत आणि इतर लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

मराठा रेजिमेंटचे नायक शुभम समाधान घाडगे हे सातारा जिल्ह्यातल्या कामेरी इथले तर, सिपॉय अक्षय दिगंबर निकुरे हे चंद्रपूर जिल्ह्यातल्या पिंपळगाव इथले रहिवासी आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या २७ डिसेंबरला स्वामित्व योजनेचा प्रारंभ होत आहे. देशातल्या सर्व जिल्ह्यांत डिजिटल पद्धतीनं जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ऑनलाईन माध्यमातून हा कार्यक्रम होईल. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं ही माहिती दिली. पन्नास लाखांहून अधिक मालमत्ता कार्डांचं वितरण या कार्यक्रमात केलं जाणार आहे.

<><><><><>

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रसिद्ध मल्याळी लेखक एम टी वासुदेवन नायर यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी कोझिकोड इथल्या मावूर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. नायर यांचं काल रात्री केरळमध्ये कोझिकोड इथं निधन झालं.

नायर यांना अखेरचा निरोप देणाऱ्यासाठी अनेक मल्याळी साहित्यिक, चित्रपट सृष्टीतले मान्यवर आणि राजकीय नेते उपस्थित होते. केरळ सरकारनं त्यांच्या निधनानंतर राज्यात आज आणि उद्या दोन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नायर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातल्या बॉर्डर-गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज मेलबर्न इथं सुरू झाला. यजमान ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाकडून सॅम कोन्टास, उस्मान ख्वाजा आणि मार्क्स लाबुशेन यांनी

अर्धशतकी खेळी केली. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद ३११ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सीमासुरक्षा दलात ३० वर्ष सेवा पूर्ण करणाऱ्या अधिकारी – कर्मचाऱ्यांना एमएसीपी म्हणजे सुधारित आश्वासित पदोन्नती योजनेचा लाभ देण्याचे आदेश दिल्ली उच्च न्यायालयानं दिले आहेत.

निवृत्तीवेतनाच्या निश्चितीसाठी एमएसीपी अंतर्गत तिसऱ्या वित्तीय पदोन्नतीची मागणी फेटाळली गेल्याविरोधात  सीमा सुरक्षा दलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयानं हा आदेश दिला. वयाची ६० वर्ष पूर्ण करण्यापूर्वी आपल्या केडरमधे ३० वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्यांना हा लाभ दिला जावा, अशी मागणी याचिकेत केली आहे. मूळवेतन आणि निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याची मागणीही याचिकाकर्त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

वित्तीय क्षेत्रात फ्री एआय, अर्थात कृत्रिम बुद्धिमतेच्या जबाबदार आणि नैतिक सक्षमिकरणासाठी एक चौकट विकसित करण्याकरता रिझर्व बंकेनं आठ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. आयआयटी मुंबईच्या संगणक अभियांत्रीकी विभागातले प्राध्यापक डॉ. पुष्पक भट्टाचार्य या समिताचे अध्यक्ष असतील. ही समिती जागतिक स्तरावर आणि भारतात, वित्तीय सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्याच्या सद्यपातळीचं मूल्यांकन करेल. कृत्रिम बुद्धिमतेशी संबंधित संभाव्य धोके देखील ही समिती निश्चित करेल, आणि मूल्यांकन, निराकरण आणि देखरेखीच्या चौकटाची शिफारस करेल.

**<><><><><>**

देश आज शहीद उधमसिंग यांची १२५ वी जयंतीनिमित्त त्यांच स्मरण करत आहे. शहीद उधमसिंग यांनी स्वातंत्र्यलढ्यात जालियानवाला बाग हत्याकांड घडवणाऱ्या जनरल ओडवायरची हत्या केली होती. देशातल्या तीन प्रमुख धर्मांमधली एकता दाखवण्यासाठी त्यांनी ब्रिटीशांच्या कोठडीत असताना राम मोहम्मद सिंग आझाद हे नाव धारण केलं होतं.

**//<><><><><>//**